## प्रेसनोट दि. १४/०९/२०१७

## अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची कामगिरी

# "परराज्यातील इसमास साडेतेरा लाख रुपयांचे अफीम बाळगल्याने अटक"

आम्ही स्वतः व पोलीस स्टाफसह सरकारी वाहनाने भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन हद्दीत अंमली पदार्थाचे गैरव्यवहार करणा-या इसमांबाबत माहिती काढणे कामी पेट्रोलिंग करीत असतांना दि. १३/०९/२०१७ रोजी १६.३५ वा. चे सुमारास स.न. ३५/२, शिव रोड, धनकवडी पुणे येथील आईमाता फरसाण या दुकाना जवळील शिव कॉलनी बस थांब्या समोरील सार्वजनिक रोडवर इसम नामे सत्यनारायण शंकर अहिर, वय ३२ वर्षे, रा. आईमाता फरसाण दुकाना जवळील, गायकवाड यांचे बिल्डींगमध्ये, तिस-या मजल्यावर भाड्याने, आंबेगाव पठार, पुणे तसेच मुळ राहणार मु. भाटोली गुजराण, ता. डुंगला, जि. चितोडगड, राजस्थान  हा इसम त्याचेकडील गुलाबी रंगाचे प्लास्टीक पिशवीसह  संशयितरित्या मिळुन आला.

वरील इसमाची एनडीपीएस कायदयातील तरतुदींचे पालन करुन त्याची झडती घेतली असता त्याचे कब्जातील गुलाबी रंगाचे प्लास्टीक पिशवीत एकुण ४ किलो ७१८ ग्रॅम कि.रु. १३,५०,०००/- चे अफीम मिळुन आल्याने त्याचे विरुद्ध भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गु.र.नं.४४९/२०१७ एन.डी.पी.एस. अॅक्ट कलम ८.(क),१७(क) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.नमुद  इसमाजवळ मिळुन आलेला अफु हा अंमली पदार्थ कमर्शिअल क्वॉन्टीटी या प्रकारातील आहे. त्यास १० वर्षापेक्षा जास्त व २० वर्षा पर्यंत वाढविता येईल इतकी शिक्षेची तरतुद आहे.

सदरची कारवाई मा. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे) मा. सुधीर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त, (आर्थिक व सायबर) गुन्हे, पुणे व मा. मिलिंद पाटील, सहा. पोलीस आयुक्त (आर्थिक व सायबर) गुन्हे, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली  अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे, पो.हवा. अविनाश शिंदे, ज्ञानदेव घनवट, विठ्ठल खिलारे, राजकुमार पाटील, नितिन सानप, स्नेहल जाधव यांनी केली  आहे.

दाखल गुन्हयाचा पुढील तपास संदीप यादव स.पो.नि. भारती विद्यापीठ पो. स्टे पुणे शहर हे करत आहेत.